Impact Factor - 3.452 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION


# RESEARCH JOURNEY


Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

APRIL - 2018

SPECIAL ISSUE-LVII (B)


# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन आणि कार्य


**विशेषांक संपादक मंडळ :**

**अतिथी संपादक :**
**डॉ. लीना पांढरे**
प्राचार्या,
कै. बिंदू रामराव देशमुख कला आणि वाणिज्य
महिला महाविद्यालय, नाशिक रोड

**कार्यकारी संपादक :**
**प्रा. तेजस बेलदार**
इंग्रजी विभाग,
कै. बिंदू रामराव देशमुख कला आणि वाणिज्य
महिला महाविद्यालय, नाशिक रोड

**सहाय्यक संपादक :**
**प्रा. भास्कर नरवटे व डॉ. मिनल बर्वे**
कै. बिंदू रामराव देशमुख कला आणि वाणिज्य
महिला महाविद्यालय, नाशिक रोड

**मुख्य संपादक :**
**डॉ. धनराज धनगर**
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
म.गांधी विद्यामंदिरचे कला व वाणिज्य महाविद्यालय,
येवला, जि. नाशिक (महाराष्ट्र)





This Journal is indexed in :
- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 57 [B] : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन आणि कार्य
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
April 2018

# डॉ. बाबासाहेब आंबडेकरांचे राष्ट्रवादासंबंधीचे विचार

**प्रा. डॉ. पी. डी. दुधाने**
एम. ए. सेट, एम. फिल्, पीएच्.डी.
के.व्ही.एन. नाईक महाविद्यालय, कॅनडा कॉर्नर, नाशिक.
मो. ९८६०२१९८८५
E-mail :- Pralhaddudhane@yahoo.com

*"डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा राष्ट्रवाद सर्व सामान्य, गरीब अस्पृश्याबद्द्लच्या कळवळयात दिसुन येतो. समान संधी व मानवी हक्क अनेक शतकापासून नाकारले गेल्यामुळे मानवी अस्तित्वालाही पारखे झालेले हे वर्ग दास्यातून व दारिद्रियातून मुक्त झाल्याखेरीज राष्ट्रजीवनाशी समरस होऊ शकणार नाहीत व राष्ट्र निर्माण होणार नाही."*

**प्रास्ताविक :-** राष्ट्रवाद ही एक व्यक्तिनिष्ट भावना असून तिचा संबंध मानवी मनाशी आहे. तिचे सामर्थ्य अगाध असून तिची मुळे बळकट आहेत. मोठ मोठाली साम्राज्य ती उलथून पाडू शकते,आणि कुणी कितीही प्रयत्न केला तरी तिचे उच्चाटन होणे अशक्यप्राय आहे. कुणी तिला विवेक शून्य प्रवृत्ती म्हणो वा शुध्द भ्रामक कल्पना म्हणो एक सत्य उरतेच ते म्हणजे ती एक अति प्रबळ शक्ती आहे. थोडक्यात एकात्मतेची भावना म्हणजे राष्ट्रवाद होय.

**राष्ट्रवादासंबंधीचे विचार :-**

मानवी इतिहासात राष्ट्रवादाने अनेक हाहाःकार केलेआहेत. प्रचंड हत्याकांडे व रक्तपात घडवून आणले आहेत. पण त्याच बरोबर त्याने अनेक नव्या राष्ट्रांना जन्मही दिला आहे, अनेक राष्ट्रांचे स्वातंत्र्यही सांभाळले आहे. राष्ट्रवाद हि केवळ विध्वंसक शक्ती नसून ती एक विधायक रचनात्मक शक्ती आहे. मानवाला त्या शक्तीने मोलाची शिकवण दिली आहे.

RESEARCHJOURNEY

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद सर्व सामान्य गरीब,अस्पृश्या बददलच्या कळवल्यात दिसून येतो. समान संधी व मानवी हक्क अनेक शतकापासून नाकारले गेल्यामुळे मानवी अस्तित्वालाही पारखे झालेले हे वर्ग दास्यातून व दारिद्रयातून. मुक्त झाल्याखेरीज राष्ट्रजीवनाशी समरस होऊ शकणार नाहीत व राष्ट्र निर्माण होणार नाही. असे आंबेडकरांना वाटत होते. तिन्ही गोलमेज परिषदांमध्ये या उपेक्षितांचे अंतरंग आंबेडकरांनी उघड केले. त्यांची स्थिती केवळ स्वातंत्र्य मिळून सुधारणार नाही. हे आंबेडकरांना ठाऊक होते. म्हणून स्वातंत्र्याची एकतर्फी मागणी करणाऱ्या काँग्रेसच्या प्रयत्नांशी ते सहभाग देऊ शकले नाहीत. परकीय स्वातंत्र्या बरोबरच अंतर्गत छळाच्याही विरुध्द आंबेडकरांनी आवाज उठवला.

आंबेडकरांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळी बरोबरच परकीय राज्यकार्त्यावरही टिका केली. ते राज्यकर्ते स्वतःच्या अंगभूत मर्यादामुळे भारतीय समाजात प्रवाही असणाऱ्या अंतःप्रवाहाचा वेध घेऊ शकत नाहीत आणि त्यामुळे या देशवासियांच्या आकांक्षा बद्दल व शिक्षणाबददल ते औदासिन्य बाळगतात. त्यांना या समाजातील विषमता जाणवते, जमीनदार या देशाच्या रयतेचे करीत असलेले शोषण दिसते, तरीपण आपल्या सिंहासनाच्या स्थैर्यासाठी या दुष्णांना हात लावायला ते धजत नाहीत. राज्यकर्ते अनुसूचित जाती जमातींना हक्क मिळवून देण्यासाठी उत्साहाने प्रयत्न करीत नाहीत. या वर्गाना आपले किमान मानवी हक्क नाकारणाऱ्याच्या विरुध्द ते आपली सत्ता वापरित नाहीत. या परिस्थितीवर आंबेडकरांच्या मते एकच तोडगा होता. आणि तो म्हणजे या जनतेला स्वातंत्र्य प्राप्त होणे. देशाचे स्वातंत्र्य व जनतेचे स्वातंत्र्य या दोन स्वातंत्र्य संकल्पना आहेत असे आंबेडकर म्हणतात. भारताबददल ते म्हणतात, आपला देश दोन राष्ट्रात विभागला आहे एक वरच्या लोकांचे, दुसरे खालच्या लोकांचे ,तसेच ते पुढे म्हणतात अनेक स्वतंत्र देशांची

जनता खऱ्या अर्थाने स्वतंत्र होतच नाही, अंतर्गत गुलामगीरीची ती भक्ष्य ठरते. हे अमेरिकेतील नीग्रोंचे उदाहरण देऊन आंबेडकरांनी सिध्द केले आहे.

राष्ट्राचे खरेखुरे स्वातंत्र्य व्हायचे असेल तर ते त्या राष्ट्रातील सर्व वर्गाना प्राप्त
झाले पाहिजे. गरजा, भय, छळ आणि शोषण या सर्वांपासून स्वतंत्र असलेली जनताच स्वातंत्र्याला खरा अर्थ आणुन देत असते.

राष्ट्राचे राजकीय व सामाजिक ऐक्य आंबेडकरांना अत्यंत मोलाचे वाटत होते. या राष्ट्राच्या सांस्कृतिक पूर्वसंचिता बदद्ल व उज्ज्वल भवितव्याबदद्ल त्यांना नितांत आदर व ठाम विश्वास होता. वर्तमान सामाजिक,राजकीय व आर्थिक परिस्थिती फारसी समाधान कारक नव्हती. हा समाज या सर्वच क्षेत्रात गटोपगटांत विदिर्ण झाला होता. तरीपण योग्य त्या काळानंतर व उचित प्रयत्नानंतर ही परिस्थिती पालटू शकेल अशी आंबेडकरांना खात्री होती. एक एकात्म राष्ट्र म्हणून हा देश जगासमोर खचितच उभा राहील असा आशावाद त्यांनी घटना समितीसमोर केलेल्या भाषणात व्यक्त केला होता. पण तो आज वास्तवात आल्याचे दिसत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबडेकरांच्या मते राष्ट्रैक्यात व सहजीवनातील आनंद या दोहोंना जातीयता मारक ठरते. त्यामुळे समाजात संकुचितपणा व समाजविघातक वृत्ती यांची जोपासना ती करते. सामाजिक प्रगती व राजकीय स्थैर्य या दोन्ही गोष्टी जातीयते मुळे व जमातवादामुळे धोक्यात येऊ शकतात. फुटीरतावाद,भाषावाद, जातीयता व जमातवाद या सर्वांच्या विरुध्द आंबेडकरांनी युध्द पुकारले होते. जातीयतेने हा देश सामाजिक व राष्ट्रीयदृष्टया दुर्बळ झाला आहे. असे त्यांना वाटत होते. ते म्हणतात, 'सार्वजनिक वृत्तीला जातीयतेने ठार मारले आहे. सार्वजनिक सहदयता तीने नष्ट केली आहे. लोकमत तीने अशक्य करुन सोडले आहे. सदगुण आज जातीला चिटकला असून नीतीमत्ताही जाती भावनेने जखडून टाकली आहे. सत्पात्राबददल सहानुभूती नाही. गुणवंतांचे कौतुक नाही. गरजवंतासाठी औदार्य नाही........... औदार्य आहे पण त्याचा प्रारंभ आणि शेवटही जातीतच होतो. सहानुभूती आहे. पण फक्त आपल्या जातीसाठीच. अशी हि जातीयता राष्ट्रवादाच्या विकासाच्या आड येते. या बददल त्यांच्या मते राष्ट्रीयत्व म्हणजे जातीय भावनेचा अभाव ........... जात वर्ण आणि संप्रदाय यांच्याविना सामाजिक बंधूता प्रत्यक्षात आणणे, आणि समाजात सुसंवाद निर्माण करणे म्हणजेच राष्ट्रवाद ' !

डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेले राष्ट्रीय ऐक्य हे केवळ राजकीय ऐक्य नव्हते. तर आत्मिक व सांस्कृतिक स्वरुपाचे ऐक्य त्यांना हवे होते. आंबडेकरांना राष्ट्रवादाचे आक्रमक वा जुलूमशाहीचे स्वरुप मान्य नाही. त्यांच्या मते सामाजिक ऐक्याखेरीज राजकीय ऐक्य जितके निरर्थक, तितकेच मानव मात्राच्या बंधुत्वाचा व आंतरराष्ट्रीय सहजीवनाचा विसर पडलेले राष्ट्रही परिणामांच्या दृष्टीने भयावह होय. सामजिक समता व धार्मिक समता निर्माण होत नसेल तर वेगळया पाकिस्तानचे सर्वांनी स्वागत केले पाहिजे असे ते म्हणत.

भारत हे एक बहूभाषिक राष्ट्र आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेचे स्वप्न साकार होण्यास एक अडचण निर्माण होते. याची जाणीव आंबेडकरांना होती. तरीपण भारताच्या सांस्कृतिक ऐक्यावर यांची अढळ श्रध्दा होती. भाषिक विविधता राष्ट्रवादाचा विकास अडवून ठेवू शकत नाही. हे गृहीत धरुनही आंबेडकरांना असे मात्र वाटते की एक समान भाषा असणे राष्ट्रनिर्मितीस आवश्यक ठरते. म्हणून त्यांनी हिन्दी राष्ट्र भाषेचे समर्थन केले आहे.

डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा अत्यंत धर्मनिरपेक्ष, पुरोगामी व बुध्दीप्रामाण्यवादी होता. परकीय राजवटी इतकेच भारतीय सनातनी कट्टरपणाला त्यांनी धारेवर धरले आहे. प्राचीन भारतीय परंपरांचे पुनरुज्जीवन राष्ट्रवादाच्या नावाने करणे त्यांना नामंजूर होते. स्वदेशाच्या भूतकाळ बददल योग्य तो अभिमान बाळगुणही इथल्या सर्वच जुन्या गोष्टीना सोन्याचे मूल्य देण्याइतपत अतीत गौरवाने त्यांना झापटले नव्हते. अतिरेकी राष्ट्रवादास ते प्रतिकुल होते. कारण असा राष्ट्रवाद सहजा सहजी अविवेकी होऊन असहिष्णूतेस जन्म देतो. म्हणून ते अशा राष्ट्रवादास विरोध करतात.

हिन्दू राष्ट्रवाद व मुस्लीम राष्ट्रवाद या संज्ञांचा त्यांना निपर्यस्त वाटतात. बहूसंख्य असणाऱ्यांचा धर्माशी राष्ट्रवादाची निरगाठ घालणे आंबेडकरांना मान्य नव्हते. अल्पसंख्यांकांनी सत्तेत भागीदारी मागीतली की, त्याला जमातवाद म्हणायचे, आणि बहूसंख्याकांनी सत्तेचा एकाधिकार चालविला की, त्याला मात्र राष्ट्रवाद म्हणायचे हे आंबेडकरांना मंजूर नव्हते. याला ते 'राष्ट्रवादी पिसाटपणा' संबोधतात त्यांच्या मते कोणत्याच धर्माला या राष्ट्राचे राष्ट्रवादी व धर्मनिरपेक्ष स्वरुप हिरावून घेण्याचा हक्क नाही. सर्व धर्माना येथे समान स्थान आहे.राष्ट्रभक्तीच्या व राष्ट्रवादाच्या नावाने दहशतवादी हालचाली करणे, व्यक्तिपूजेचे देव्हारे माजविणे, गुलामगिरीला, या ना त्या प्रकारे टिकवून ठेवणे याला आंबेडकरांनी विरोध केला होता.

**भारतीय राष्ट्रवादासाठी उपाय योजना : -**

आजच्या परिस्थितीत आंबेडकरांचा राष्ट्रवाद अस्तित्वात आणण्यासाठी साधारणत : प्रत्येकाला समान संधी आणि मानवी आधिकाराचा उपभोग घेता येईल असे वातावरण निर्माण झाले पाहिजे. देशाला स्वातंत्र्य आहे. राज्यघटनाही उत्तम आहे. पण अनुसुचित जाती,जमाती ,मागासवर्ग व दीन दुबळयांना स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. आज देशाला स्वातंत्र्य मिळाले पण खऱ्या अर्थाने मागासलेल्या लोकांना स्वांतत्र्य मिळाले नाही. त्यांना आपल्या मुलभूत अधिकारांचा उपभोग घेता येत नाही. मागासलेल्या लोकांची आर्थिक, समाजिक आणि राजकीय परिस्थिती सुधारलेली नाही. राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी आज भारतात जी जातीयता आहे ती जातीयता नष्ट झाली पाहिजे. एवढेच नव्हे तर समाजामध्ये आत्मिक एकात्मता नाही ती निर्माण झाली पाहिजे. तसेच कोणत्याही धर्माने कोणत्याही धर्मावर आपले वर्चस्व निर्माण करु नये. पण आज हिदूंचे वर्चस्व असल्याचे जाणवते ते कमी झाले पाहिजे. राष्ट्रवादाच्या बळकटीसाठी हिन्दी ही राष्ट्रभाषा असली पाहिजे. त्याचा स्वीकार सर्व राज्यांनी केला पाहिजे.परंतू सर्व राज्यानी हिन्दी राष्ट्र भाषा म्हणून स्वीकारलेली नाही. ती स्वीकारणे गरजेचे आहे. राष्ट्रवादासाठी सर्व धर्म समभाव दिसत नाही तो दिसला पाहिजे. तरच भारतात राष्ट्रवाद निकोप वाढीला लागेल.

RESEARCHJOURNEY

**संदर्भ सूची :-**


१. भगवान दास (सपा) : दस स्पोक आंबेडकर (निवडक व्याख्याने): खड पहिला : पृष्ठ ८-९
२. आंबेडकर : दि अनहिलेशन ऑफ कास्ट : पृ -३७
३. कुबेर, डॉ वा.ना : डॉ. आंबेडकर : विचारमंथन, केसरी प्रकाशन,पुणे १९७२ पृ १६४
४. आंबेडकर : पाकीस्तान और पार्टिशन ऑफ इडिया : पृ २६०-६१
५. आंबेडकर : थॉटस ऑन लिंग्विस्टिक स्टेट्स : पृ १२
६. डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे : आधुनिक भारतातील राजकीय विचार.